**फौजदारी किरकाळ अर्ज क्र.१६२/२०२४ मधील निशाणी २० वरील आदेश**

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. सामनेवाला क्र.२ ते ४ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे अर्जदार यांनी त्यांचेविरुध्द हे प्रकरण कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याअंतर्गत दाखल केलेले आहे. समन्स मिळालेवर सामनेवाला हे हजर होवून त्यांनी वकिलपत्र दिले असून म्हणणे देणेस मुदत घेतली आहे. म्हणणे देणेस सामनेवाला यांना १३, महिने २४ दिवसांचा विलंब झालेने सामनेवाला यांचेविरुध्द अर्ज विना म्हणणे चौकशीसाठी नेमण्यात आला आहे. सामनेवाला यांना याकामी म्हणणे द्यावयाचे होते. परंतु, सामनेवाला क्र.४ या आजारी असल्याकारणाने त्यांचे देखभालीत सामनेवाला क्र.२ व ३ यांना न्यायालयात येता आले नाही. त्यामुळे, सामनेवाला यांना मुदतीत म्हणणे देता आले नाही. सामनेवाला यांचे म्हणणे पुराव्याकामी वाचले जाणे गरजेचे आहे. अन्यथा सामनेवाला यांचेवर मोठा अन्याय होणार आहे. सबब, त्यांचेकडून म्हणणे दाखल करणेसाठी झालेला १३, महिने २४ दिवसांचा विलंब माफ करणेत यावा व त्यांना म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती सामनेवाला क्र.२ ते ४ यांनी केली आहे. अर्जदार यांनी या अर्जास सक्त हरकत घेतली आहे. परंतु, सामनेवाला क्र.२ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, सामनेवाला यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. अर्जदार यांनी हा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याप्रमाणे दाखल केला आहे. त्यामुळे, अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणेसाठी त्यांचेकडून म्हणणे दाखल करणेसाठी झालेला

१३ महिने, २४ दिवसांचा विलंब माफ करणे व त्यांना म्हणणे सादर करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. तथापि, सामनेवाला क्र.२ ते ४ यांचेकडून झालेला विलंब पाहता त्यांना रक्कम रु.१०००/– (रुपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट होणे व ती कॉस्ट अर्जदार क्र.१ यांना अदा करणे तितकेच आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

**१.** सामनेवाला क्र.२ ते ४ यांचा हा अर्ज त्यांनी अर्जदार क्र.१ यांना रक्कम रु.१०००/– (रुपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

**२.** सामनेवाला क्र.२ ते ४ यांचेकडून म्हणणे सादर करणेस झालेला १३ महिने, २४ दिवसांचा विलंब माफ करणेत येत आहे व त्यांना त्यांचे म्हणणे सादर करणेस परवानगी देणेत येत आहे.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.02.10 17:50:49 +0530

**दिनांक : १०.०२.२०२६** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर.**

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol U. Salpe)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Akole.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 10.02.2026 |
| Transcribed on | : | 10.02.2026 |
| Checked and signed on | : | 10.02.2026 |